राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...!



परळी संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

https://www.parlisangharshneta.in

9881265102 संपादक - मोहन व्हावळे



बीड वर्षे- 11 वे | अंक क्र 126 रविवार दि. 31 मे 2026 पृष्ठे 4 किंमत 2 ₹ RNI: MAHMAR/2016/67060

# 42 डिग्री सेल्सियसवर पारा डोक्याला मुंडासे, बाजे ठाण, मनोज जरांगे यांचं शेतशिवारात

## रणरणत्या उन्हात उपोषण

## मराठा आंदोलक आक्रमक, समृद्धी, सोलापूर- धुळे महामार्ग रोखला!



मराठा आरक्षण व इतर मागण्यांसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील हे तळपत्या उन्हात उपोषणाला बसले आहेत. 43 अंश तापमानात शेतात एका बाजेवर संतरजी टाकून जरांगे पाटील बसले आहेत. त्यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी समाज बांधव मोठ्या संख्यने अंतरवालीत दाखल झाले आहेत. अनेक आंदोलकांनी शर्ट काढून उन्हात बसत जरांगे यांना समर्थन दर्शवले. तर महिला, लहान मुलेही या आंदोलनात सहभागी झाले आहेत.दरम्यान, मनोज जरांगे पाटील (Manoj Jarange patil) यांची प्रकृती उन्हामुळे बिघडू लागली आहे. तसा आंदोलकांचा संयम सुटू लागला आहे. आंदोलना दरम्यान, पाठिंबा देण्यासाठी आलेल्या एका महिलेला भोवळ आल्याने तिला तातडीने ॲम्ब्युलन्सने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सकाळी दहापासून उपोषणाला सुरूवात झाली. त्यानंतर मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांना सावलीत बसण्याचे आवाहन केले. मात्र ते नाकारत जरांगे हे उन्हातच बसले. दुपारी ऊन तापल्याने जरांगे पाटील यांना प्रचंड त्रास जाणवू लागला. उपस्थित आंदोलकांना हे सहन न झाल्याने त्यांनी थेट समृद्धी महामार्गावर काही वेळ रास्ता रोको आंदोलन केले. तर दुपारी साडेचारच्या सुमारास सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग रोखण्याचा प्रयत्न काही आंदोलकांनी केला. पोलीसांनी आंदोलकांना बाजूला करत वाहतूकीला वाट करून दिली. मराठवाड्यातील लातूर, हिंगोली जिल्ह्यामध्ये देखील मनोज जरांगे पान 3 वर

# मनोज जरांगे पाटील यांची उपोषण स्थळी जावून भेट घ्या

## पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश





मुंबई दि. 30 --मराठा समाज बांधवांच्या आरक्षणाच्या मागणीसाठी कडक उन्हात आमरण उपोषणास बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांची उपोषण स्थळी जावून भेट घ्यावी, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. ना. पंकजाताई मुंडे यांनी यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना लेखी पत्र पाठवून निर्देश दिले आहेत. ना. पंकजाताई म्हणाल्या की, मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी श्री मनोज जरांगे पाटील भर उन्हात जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. जिल्हाधिकारी जिल्हयाच्या पान 3 वर

# मी अनू एकनाथ शिंदेंनी मराठा समाजासाठी ऐतिहासिक निर्णय घेतले"

## मनोज जरांगेंच्या उपोषणावर देवेंद्र फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया



58 लाख जणांच्या कुणबी नोंदीना प्रमाणपत्र आणि वैधता द्यावी, मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावं या मागणीसाठी मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील आजपासून पुन्हा उपोषणाला बसले आहेत. परिसरातील काही मंडळींनीही त्यांना पाठिंबा दिला असून मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटीलही त्यांची समजूत काढण्याकरता आंदोलन स्थळी पोहोचले आहेत. दरम्यान, या आंदोलनावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते नागपुरात बोलत होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "सरकार या प्रश्नावर नेहमीच सकारात्मक आहे. सरकारने वारंवार निर्णय घेतला आहे. पान 3 वर

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी योगदान देणे माझे भाग्य

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं विधान



ठाणे - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त ठाण्यातील धनगर प्रतिष्ठान आयोजित अहिल्यादेवी होळकर स्मारक उद्घाटन आणि धनगर रत्न पुरस्कार सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शांवर राज्यकारभार चालवत असल्याचे सांगितले. स्मारक उभारणीसाठी योगदान देता आले, हे आपले भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी

# उद्या तारीख, वेळ जाहीर करतो आता ढेकळात बसूनच

## • लक्ष्मण हाकेंनी जरांगेंना ललकारले; प्रतिआंदोलनाचा इशारा



मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण सुरु केले आहे. जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीमधील शेतात बाज टाकून जरांगे पाटील उन्हामध्ये उपोषणाला बसले आहेत. अशातच आता जरांगे पाटलांच्या या आंदोलनानंतर ओबासी नेतेही आक्रमक झाले असून अनेकांनी प्रतिआंदोलनाचा इशारा दिला आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही आता रस्त्यावर उतरण्याची घोषणा केली आहे. पान 3 वर












# लोकमाता अहिल्याबाई :न्याय,करुणा आणि सुशासनाचा दीपस्तंभ

आकाशाला गवसणी घालण्याची जिद्द आणि संकटांवर मात करण्याचे सामर्थ्य स्त्रीच्या ठायी जन्मतःच असते.ही जन्मजात देणगी स्वीकारून काही स्त्रियांनी तर इतिहासाच्या पानावर आपले नाव सुवर्णाक्षराने कोरले आहे. आपल्या धैर्य,त्याग आणि असामान्य कार्याने समाजाला नवी दिशा देत देत आपल्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी छाप या स्त्रियांनी इथल्या लोकमनावर टाकली.भारतीय इतिहासाच्या विशाल पटलावर काळाच्या सीमांना ओलांडून प्रेरणा देण्याचे काम आजपर्यंत ज्या महिलांनी केले ; त्यात अहिल्याबाई होळकर हे एक असंच तेजस्वी व्यक्तिमत्त्व . . .ज्यांच्या विचारांचं आणि कर्तृत्त्वाचं गारुड आजही येथील समाजमनावर आहे.आज त्यांच्या जयंती निमित्त केवळ त्यांना स्मरण करणे हा हेतू नाही तर त्यांच्या कार्यकाळात त्यांनी न्याय,लोककल्याण,स्त्रीशक्ती आणि आदर्श प्रशासनाच्या मूल्यांना जे महत्त्व प्राप्त करून दिले होते;त्यांना वंदन करणे होय.

अठराव्या शतकात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय संकुचित होता.शिवाय राजकीयदृष्ट्या परिस्थितीही अस्थिर अशा स्वरुपाची बनली होती. अशा वातावरणात एका कणखर स्त्रीने राज्यकारभार तर सांभाळलाच ;पण त्याबरोबर त्यांनी त्या राज्यकारभाराला एक वेगळा आयाम प्राप्त करून दिला. आजच्या आधुनिक लोकशाहीपेक्षाही काकणभर सरस असे प्रशासन त्यांनी केले.पारदर्शकता,लोकाभिमुखता, नि:पक्षपातीपणा,नैतिकता हे त्यांच्या राज्यकारभाराचे महत्त्वाचे पैलू होते. सत्ता म्हणजे केवळ अधिकार नव्हे तर ती जनसेवेची जबाबदारी आहे. ही भूमिका घेऊन कार्य केल्यामुळे त्यांच्या कारकिर्दीत माळवा प्रदेश अतिशय समृद्ध,सुरक्षित व सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न बनला होता.नगर जिल्ह्यातील चौंडी या छोट्याशा गावापासून सुरु झालेला त्यांचा जीवनप्रवास इंदूरच्या राजगादीपर्यंत पोहोचला;पण सत्ता आणि वैभवाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा करुणा आणि धर्मशीलता कधीही कमी केली नाही.उलट लोकाभिमुख निर्णय घेणे हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता. . .म्हणूनच त्यांना 'लोकमाता'या उपाधीने संबोधले जाते.आपल्या कार्याने जन मनात तसे स्थान त्यांनी निर्माण केले.त्यांनी प्रजेच्या अडचणी थेट ऐकल्या व न्यायदानात कधीही पक्षपात होऊ दिला नाही.अगदी यादृष्टीने त्यांच्या संस्थानातील सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलांचे उदाहरण विशेष लक्षात घेण्यासारखे आहे.तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला तेव्हा अहिल्याबाईंनी कोणताही मुलाहिजा न बाळगता त्याला तुरुंगात डांबले. यावरुन त्यांच्या दृष्टीने नातेसंबंधापेक्षा न्याय मोठा होता हे दिसून येते. स्वकीयांना शिक्षा देतानाही त्यांनी नि:पक्षपातीपणाला मुळीच तडा जाऊ दिला नाही.



अहिल्याबाई होळकर यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे करुणा . . .माळवा प्रदेशात दुष्काळ पडल्यानंतर अन्नछत्र सुरु केली.शेतकऱ्यांचा शेतसारा माफ,गरीब व उपाशी लोकांना मोफत अन्नधान्य वाटप, जनावरासाठी चारा व पाण्याची व्यवस्था ,विधवा व निराधार स्त्रियांना आर्थिक मदत,स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी विशेष काळजी,समाजातील दुर्बल घटकांना संरक्षण ,यात्रेकरूंना विश्रांती मिळावी म्हणून अनेक धर्मशाळांचे बांधकाम, विविध तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अर्थातच काशी,गया ,सोमनाथ, रामेश्वर यासारख्या तीर्थक्षेत्रामध्ये अन्नछत्रांची सुरुवात . . .ही सर्व उदाहरणे त्यांच्या ठायी असलेला करुणेचा पाकच होय.त्यांच्या करुणेचा पाया हा मानवतावादावर आधारित होता. 'प्रजेचे सुख हेच राजाचे सुख 'हाच मंत्र त्यांना अभिप्रेत होता.

अहिल्याबाई होळकरांच्या काळात माळवा प्रांतात कायदा व सुव्यवस्था अतिशय उत्तम होती,चोरी लुटमारी यावर त्यांनी कठोर नियंत्रण ठेवले होते,प्रजेच्या सुखदु:खाची काळजी त्यांनी सतत घेतली होती,शेतकऱ्याप्रती असलेली संवेदनशीलता,धार्मिक सहिष्णुता,महिलांना सन्मानपूर्वक वागणूक ...या सर्व प्रशासनातील गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांचे शासन हे सुशासनाचा दीपस्तंभच म्हणून लक्षात येते.

अहिल्याबाई होळकर केवळ लोककल्याणकारी राणीच नव्हत्या;तर आपल्या संस्थानाचे हित जोपासणाऱ्या कुशल व धाडसी राज्यकर्त्याही होत्या. मल्हारराव होळकर व खंडेराव होळकर यांच्या निधनानंतर होळकरांचे संस्थान अस्थिर झाले आहे अशी भूमिका काही सत्ताकेंद्री लोकांची बनली होती.त्यात राघोबादादा हे अग्रेसर होते.अहिल्याबाई स्त्री आहेत त्यामुळे त्यांना हे संस्थान सांभाळता येणार नाही,म्हणून राघोबा दादांनी होळकर संस्थान पेशवाईत विलीन करण्याचा प्रयत्न केला.याचवेळी अहिल्याबाईने राघोबांना एक कठोर पण मुत्सद्दी भाषेतील खलिता पाठविला.त्यात - "होळकर घराणे हे कुणाच्या कृपेवर उभे नाही; ते तलवारीच्या आणि कर्तुत्वाच्या बळावर उभे राहिले आहे. त्यामुळे हे घराणे सहजासहजी विलीन होणार नाही."असे लिहून हातात तलवार नसतानाही शब्दाच्या धारेने त्यांना नमविण्याचे काम केले.तो खलिता म्हणजे होळकर घराण्याच्या स्वाभिमानाचा जाहीरनामाच होता.

आपलं संस्थान सुव्यवस्थित टिकवण्यासाठी अहिल्याबाई होळकरांनी स्त्रियांची एक लढाऊ फौजच तयार केली होती.त्या स्वतः या फौजेचे नेतृत्व करत असताना हातात तलवार घेऊन अग्रेसर राहत असत. आपल्या संस्थानाचे संरक्षण व हित साधण्यासाठी त्या नेहमी प्रयत्नशील राहत असत.खरंतर एका नंतर एक दु:ख पचवणं आणि त्यातून उभे राहणं फार अवघड असतं. 1754 मध्ये झालेल्या कुंभेरच्या लढाईत पती खंडेराव होळकर यांचे निधन,त्यानंतर सासूबाई गौतमी (1761 ) ,सासरे मल्हारराव (1766 ) ,मुलगा मालेराव (1767 )अशा एका नंतर एक कुटुंबातील सदस्यांचा मृत्यू व दु:खाची मालिका पचवत त्यांनी स्वतःला सिद्ध केलं.दु:खाला कवटाळून रडत बसण्यापेक्षा संस्थानासाठी लढणं हा त्यांचा बाणा बनला.त्यांच्या या वृत्तीचे वर्णन करताना कवयित्री ज्योती गंधे-

"दैवाने घाला घातला  
भाळीचा मळवट पुसला  
परि धीर मनाचा केला  
श्वशुर शब्दा मानियेले  
पतीसंगे सती न जाता  
उद्धार कुळाचा केला ."

असे वर्णन केले आहे.अगदी या शब्दाप्रमाणे आयुष्यातील सर्व दु:खे बाजूला सारून लोककल्याणाचे समाजहितैशी सुशासन केल्यामुळे त्या पुण्यश्लोक, लोकमाता अहिल्याबाई होळकर म्हणून सुपरिचित झाल्या.महिला सक्षमीकरणाचे हे एक मूर्तिमंत उदाहरण आहे.अशा मराठ्यांच्या इतिहासातील या महानायिकेला जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन . . .त्यांच्या विचारांचा जागर घालणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल . . . !



**प्रा. डॉ.राजकुमार किशनराव यल्लावाड**  
**कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय**

# अहिल्यादेवी होळकर : समाजकल्याणाची दीपस्तंभ

**डॉ. राजेंद्र बगाटे**



भारतीय इतिहासात अनेक पराक्रमी राजे, दूरदृष्टी असलेले प्रशासक आणि लोकहितासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्ती होऊन गेल्या; परंतु जनतेच्या मनावर मातृत्वाच्या भावनेने अधिराज्य गाजविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. 31 मे हा दिवस त्यांच्या जयंतीदिनाच्या रूपाने संपूर्ण देशात आदराने साजरा केला जातो. मराठेशाहीच्या इतिहासात प्रशासन, न्याय, समाजकारण आणि लोककल्याण यांचा अद्भुत संगम घडवून आणणाऱ्या अहिल्यादेवी या केवळ एका संस्थानाच्या राणी नव्हत्या, तर त्या लोकांच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या एक संवेदनशील माता होत्या. त्यांचे संपूर्ण जीवन हे कर्तव्य, त्याग, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेचा आदर्श मानले जाते. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही समाजजीवनावर जाणवतो. स्त्रीशक्तीचे एक प्रभावी प्रतीक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. समाजातील दुर्बल घटकांना आधार देत न्याय आणि सुशासनाचा आदर्श उभा करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे व्यक्तिमत्त्व जितके प्रेरणादायी आहे तितकेच अभ्यासपूर्ण देखील आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या अहिल्यादेवींना बालपणापासूनच संस्कार, कष्ट आणि समाजकल्याणाचे शिक्षण मिळाले. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची परंपरा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी आपल्या कन्येला शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात संवेदनशीलता, विचारशीलता आणि निर्णयक्षमता विकसित झाली. बालपणापासूनच त्यांना ग्रंथांचे वाचन, लोकांशी प्रेमाने वागणे आणि संकटात धैर्य राखणे यांचे संस्कार मिळाले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणा आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण होते.

एक प्रसंग त्यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारा ठरला. मराठा साम्राज्यातील पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर हे पुण्याकडे जात असताना चौंडी येथे थांबले होते. त्या वेळी त्यांनी मंदिरात भक्तिभावाने पूजा करणाऱ्या अहिल्याबाईंचे दर्शन घेतले. त्यांच्या शांत, संयमी आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन मल्हाररावांनी आपला पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह करण्याचा निर्णय घेतला. अल्पवयातच त्यांचा विवाह इंदूरच्या होळकर घराण्यात झाला आणि त्या होळकर घराण्याच्या सून बनल्या. विवाहानंतर त्यांनी केवळ राजघराण्याच्या परंपरा जपल्या नाहीत, तर प्रशासन आणि लोककल्याणाची जाणही आत्मसात केली.

मल्हारराव होळकर हे पराक्रमी, दूरदृष्टी असलेले आणि अनुभवी प्रशासक होते. त्यांनी अहिल्यादेवींना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले. युद्धनीती, न्यायदान, आर्थिक व्यवहार, प्रजेच्या अडचणी आणि प्रशासनातील बारकावे यांचे ज्ञान त्यांनी अहिल्यादेवींना दिले. त्या काळात स्त्रियांना राज्यकारभारात स्थान मिळणे दुर्मीळ होते; मात्र अहिल्यादेवींनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हे आव्हान समर्थपणे स्वीकारले. त्यांना लोकांच्या समस्या समजून घेण्याची आणि त्यावर संवेदनशीलतेने उपाय करण्याची विलक्षण क्षमता होती.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले. त्यांचे पती खंडेराव होळकर यांचा कुंभेरच्या युद्धात मृत्यू झाला. त्या वेळी सती जाण्याचा समाजाचा दबाव होता; परंतु मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून रोखले. हा निर्णय भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण त्यातून एका महान राज्यकर्तीचा उदय झाला. पुढे मल्हारराव होळकर यांचे निधन झाले आणि काही काळानंतर त्यांच्या पुत्राचाही मृत्यू झाला. सततच्या वैयक्तिक दुःखांनी खचून न जाता अहिल्यादेवींनी धैर्याने राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली. एका स्त्रीने इतक्या प्रतिकूल परिस्थितीत नेतृत्व स्वीकारणे ही त्या काळात अत्यंत धाडसी बाब होती.

अहिल्यादेवी होळकर यांनी इंदूर संस्थानाचा कारभार अत्यंत कुशलतेने चालविला. त्यांनी महेश्वर ही आपली राजधानी केली. नर्मदेच्या काठी वसलेले महेश्वर त्यांच्या कारकिर्दीत सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या समृद्ध झाले. त्यांनी राज्यातील प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त आणली. त्यांच्या दरबारात न्यायदान अत्यंत निष्पक्षपणे केले जाई. गरीब असो किंवा श्रीमंत, सर्वांना समान न्याय मिळत असे. त्या स्वतः जनतेच्या तक्रारी ऐकत असत. लोकांच्या समस्या समजून घेऊन तत्काळ उपाययोजना करण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला स्थान नव्हते.

अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लोककल्याणाची भावना. त्यांनी प्रजेच्या सुखाला सर्वोच्च प्राधान्य दिले. शेतकऱ्यांसाठी सिंचन व्यवस्था, विहिरी, तलाव आणि धरणांची उभारणी करण्यात आली. व्यापाऱ्यांना सुरक्षित वातावरण दिले गेले. व्यापार आणि उद्योगांना प्रोत्साहन दिल्यामुळे आर्थिक प्रगती झाली. महेश्वरी साड्यांच्या परंपरेला त्यांनी चालना दिली. आजही महेश्वरी साडी ही भारतीय वस्त्रसंस्कृतीचा अभिमान मानली जाते.

अहिल्यादेवींनी महिलांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षेसाठी अनेक निर्णय घेतले. स्त्रियांच्या समस्या समजून घेऊन त्यांना आधार देण्याचे कार्य त्यांनी केले.




विधवा महिलांना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले . स्त्रियांना मालमत्तेचे अधिकार मिळावेत, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी त्या जागरूक होत्या. स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून समाजनिर्मितीत तिची महत्त्वाची भूमिका आहे, हा संदेश त्यांच्या जीवनातून दिसून येतो.

अहिल्यादेवी होळकर यांची न्यायव्यवस्था अत्यंत प्रभावी होती. त्यांच्या दरबारात अन्यायाला मुळीच थारा नव्हता. त्या प्रत्येक प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करून निर्णय घेत असत. लोकांना न्याय मिळावा यासाठी त्या कटिबद्ध होत्या. त्यांचा न्याय निष्पक्ष आणि मानवतावादी होता. त्यामुळे जनतेमध्ये त्यांच्याबद्दल अपार आदर निर्माण झाला. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवले. चुकीचे वर्तन करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाई.

अहिल्यादेवींच्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था होती. त्यांनी सैन्य व्यवस्था मजबूत ठेवली. शत्रूंचा सामना करण्यासाठी आवश्यक ते निर्णय घेतले. परंतु युद्धापेक्षा शांततेला आणि विकासाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यांच्या प्रशासनात आर्थिक शिस्त होती. राज्याच्या उत्पन्नाचा उपयोग लोककल्याणासाठी करण्यात येत असे. खर्चात काटकसर आणि जनहिताचा विचार हा त्यांच्या प्रशासनाचा पाया होता.

अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात धार्मिकता होती; परंतु ती अंधश्रद्धेवर आधारित नव्हती. त्यांचा धर्म म्हणजे मानवसेवा होता. गरीब, गरजू आणि पीडित लोकांना मदत करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांनी अनेक दानधर्म केले. अन्नछत्रे चालवली. यात्रेकरू, साधू-संत आणि गरजू लोकांसाठी निवासव्यवस्था केली. त्यांचे जीवन अत्यंत साधे होते. राजसत्ता असूनही त्यांनी वैभवापेक्षा सेवेला महत्त्व दिले.

त्यांच्या जीवनातील साधेपणा आजच्या काळातही प्रेरणादायी वाटतो. त्या राजवाड्यात राहत असल्या तरी त्यांच्या वागण्यात अहंकार नव्हता. त्या सामान्य लोकांशी प्रेमाने संवाद साधत असत. जनतेच्या दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या समस्या स्वतः समजून घेणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्यामुळेच लोकांनी त्यांना 'लोकमाता' ही उपाधी दिली.

अहिल्यादेवी होळकर यांनी शिक्षण आणि संस्कृतीच्या जतनासाठीही महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी विद्वान, कवी, पंडित आणि कलाकारांना आश्रय दिला. महेश्वर हे त्या काळात संस्कृती आणि साहित्याचे केंद्र बनले. सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याबरोबरच त्यांनी लोककलेलाही प्रोत्साहन दिले. समाजातील नैतिक मूल्ये टिकून राहावीत यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

भारतीय स्त्रीशक्तीचा विचार केला तर अहिल्यादेवींचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी संकटांना न घाबरता नेतृत्व स्वीकारले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून जनतेच्या हितासाठी कार्य केले. त्यांचे जीवन हे संघर्षातून उभे राहिलेल्या यशाचे उदाहरण आहे. आजच्या महिलांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. आत्मविश्वास, निर्णयक्षमता, कर्तव्यनिष्ठा आणि लोकसेवा या गुणांचा आदर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून दिसतो.

आजच्या काळात प्रशासनात पारदर्शकता, न्याय आणि लोकाभिमुखता यांची आवश्यकता अधिक जाणवते. अशा वेळी अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य मार्गदर्शक ठरते. त्यांनी सत्ता ही जनसेवेचे साधन मानली. आज अनेक ठिकाणी भ्रष्टाचार, अन्याय आणि स्वार्थी राजकारण दिसून येते; परंतु अहिल्यादेवींच्या प्रशासनात प्रामाणिकपणा आणि नैतिकता सर्वोच्च होती. म्हणूनच त्यांच्या कार्याचा अभ्यास आजही प्रशासनशास्त्र आणि समाजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

अहिल्यादेवींच्या कार्यातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश मिळतो. त्या काळात स्त्रियांना अनेक सामाजिक बंधने होती; तरीही त्यांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहासात अजरामर स्थान मिळविले. त्यांनी सिद्ध करून दाखवले की स्त्री सक्षम असेल तर ती राज्यकारभार, समाजकारण आणि नेतृत्व या सर्व क्षेत्रांत यशस्वी होऊ शकते. त्यांचे जीवन महिलांसाठी प्रेरणास्रोत आहे.

भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्यात अहिल्यादेवींचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी केवळ धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार केला नाही, तर सांस्कृतिक एकात्मतेलाही बळ दिले. उत्तर ते दक्षिण भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांवर त्यांनी कामे केली. यामुळे देशाच्या सांस्कृतिक ऐक्याला चालना मिळाली. त्यांच्या कार्यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून येते.

महेश्वर नगरीला त्यांनी दिलेली सांस्कृतिक ओळख आजही टिकून आहे. नर्मदेच्या घाटांवर उभे असलेले मंदिरसमूह, राजवाडे आणि वास्तू त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात. महेश्वरी वस्त्रोद्योगाला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचे साधन आहे. स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन आर्थिक स्वावलंबन वाढविण्याचा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रगत होता.

अहिल्यादेवींच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संकटसमयी दाखवलेले धैर्य. सततच्या कौटुंबिक दुःखांनंतरही त्यांनी खचून न जाता जनतेच्या हितासाठी काम केले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून कर्तव्याला प्राधान्य देणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महानता होती. त्यांच्या जीवनातून आपल्याला संकटांवर मात करून पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.

त्यांच्या प्रशासनात धार्मिक सहिष्णुता होती. विविध समाजघटकांना त्यांनी समान वागणूक दिली. कोणत्याही धर्माविषयी द्वेषभावना न ठेवता सर्वांच्या श्रद्धेचा आदर केला. त्यांच्या या दृष्टिकोनामुळे समाजात सौहार्द आणि शांतता टिकून राहिली. आजच्या काळात सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी त्यांच्या विचारांची गरज अधिक आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित नाही. आजही त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची उपयुक्तता जाणवते. चांगले प्रशासन कसे असावे, जनतेच्या गरजा कशा ओळखाव्यात, समाजातील दुर्बल घटकांना कसा आधार द्यावा आणि सत्ता लोककल्याणासाठी कशी वापरावी याचे आदर्श उदाहरण म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत. म्हणूनच त्यांना भारतीय इतिहासातील सर्वोत्तम राज्यकर्त्यांपैकी एक मानले जाते.

महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यांच्या कार्याचा अभ्यास करून नवीन पिढीला प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक ठिकाणी व्याख्याने, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात. ही जयंती केवळ स्मरणाचा दिवस नसून आदर्श जीवनमूल्यांचा विचार करण्याची संधी आहे.

आजच्या समाजात नैतिक मूल्यांची घसरण, वाढती असमानता आणि स्वार्थी वृत्ती यांसारख्या समस्या दिसून येतात. अशा परिस्थितीत अहिल्यादेवींचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांनी लोकसेवा, न्याय, प्रामाणिकपणा आणि मानवतेच्या मूल्यांना प्राधान्य दिले. त्यांच्या जीवनातून समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते.

अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी आपल्या कार्याने स्त्रीशक्तीचा नवा आदर्श निर्माण केला. लोककल्याणकारी प्रशासन, धार्मिक सहिष्णुता, न्यायप्रियता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. त्या केवळ एका राज्याच्या राणी नव्हत्या, तर जनतेच्या हृदयातील लोकमाता होत्या. त्यांच्या कार्याचा वारसा आजही समाजाला प्रेरणा देत आहे.

31 मे रोजी त्यांची जयंती साजरी करताना आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे, न्याय आणि समानतेसाठी कार्य करणे, स्त्रीसन्मान जपणे आणि लोकहिताला प्राधान्य देणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे भारतीय संस्कृतीतील सेवा, त्याग आणि मानवतेच्या महान परंपरेचे प्रतीक आहे. त्यांचा आदर्श प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी राहील आणि लोककल्याणाच्या कार्यासाठी सदैव मार्गदर्शक ठरेल.

***डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)* ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर :

## लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श न्याय, विकास आणि लोकसेवेचा अखंड दीपस्तंभ



वडवणी | प्रतिनिधी

भारतीय इतिहासातील आदर्श राज्यकर्त्यांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव अत्यंत आदराने आणि अभिमानाने घेतले जाते. प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या, न्यायप्रिय प्रशासनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या आणि संपूर्ण भारतातील धार्मिक व सांस्कृतिक वारसा जतन करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांची जयंती 31 मे रोजी साजरी होत आहे. या निमित्ताने त्यांच्या कार्याचा गौरवपूर्वक स्मरण करण्यात येत आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म 31 मे 1725 रोजी अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडील मानकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा नसतानाही त्यांनी आपल्या कन्येला शिक्षण दिले. त्यामुळे लहानपणापासूनच अहिल्याबाई धार्मिक, कर्तव्यनिष्ठ, बुद्धिमान आणि समाजाभिमुख बनल्या.मराठा साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी चौंडी येथे मंदिरात प्रार्थना करणाऱ्या अहिल्याबाईंचे व्यक्तिमत्त्व पाहून प्रभावित होत आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह घडवून आणला. विवाहानंतर त्यांनी राजकारण, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेचे सखोल ज्ञान आत्मसात केले.अहिल्यादेवींच्या जीवनात अनेक दुःखद प्रसंग आले. सन 1754 मध्ये पती खंडेराव होळकर यांचे निधन झाले. त्यानंतर 1766 मध्ये सासरे मल्हारराव होळकर आणि पुढील वर्षी पुत्र मालेराव यांचेही निधन झाले. या संकटांनी खचून न जाता त्यांनी स्वतःला प्रजेच्या सेवेसाठी समर्पित केले. सन 1767 मध्ये त्यांनी मालवा राज्याची सूत्रे हाती घेतली. त्या काळात स्त्रीने राज्यकारभार सांभाळणे ही अत्यंत दुर्मीळ गोष्ट होती. मात्र आपल्या दूरदृष्टी, कार्यक्षमता आणि धैर्याच्या बळावर त्यांनी मालवा संस्थानाला समृद्धीच्या शिखरावर नेले. महेश्वर ही राजधानी निवडून जवळपास अठ्ठावीस वर्षे त्यांनी यशस्वीपणे राज्यकारभार केला.

अहिल्यादेवींची ओळख न्यायप्रिय राज्यकर्ती म्हणून होती. त्यांच्या दरबारात सामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि गरीब व्यक्तीलाही न्याय मिळत असे. न्यायदान करताना धर्म, जात, संपत्ती किंवा पद यांचा विचार न करता त्यांनी निष्पक्ष निर्णय दिले. त्यामुळे त्यांच्या कारभाराविषयी प्रजेमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण झाली.लोककल्याणकारी शासन ही त्यांच्या प्रशासनाची प्रमुख वैशिष्ट्ये होती. शेतकऱ्यांसाठी करसवलती, सिंचन व्यवस्था, विहिरी, तलाव, बंधारे, रस्ते आणि दळणवळण सुविधांचा विकास करण्यात त्यांनी विशेष लक्ष दिले. दुष्काळग्रस्त आणि गरजू लोकांसाठी मदतीची व्यवस्था करून लोककल्याणाचा आदर्श निर्माण केला.

महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. विधवा महिलांना आधार, स्त्रियांच्या सन्मानाचे संरक्षण आणि समाजात त्यांना प्रतिष्ठेचे स्थान मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले. त्यामुळे त्या स्त्रीशक्तीच्या प्रेरणास्थान बनल्या.अहिल्यादेवींनी धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही मोठे कार्य केले. काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीसह सोमनाथ, अयोध्या, मथुरा, गया, उज्जैन, द्वारका, हरिद्वार, रामेश्वरम्, बद्रीनाथ, केदारनाथ, नाशिक आणि ओंकारेश्वर यांसारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि यात्रेकरूंसाठी सुविधा उभारण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले.महेश्वरला त्यांनी सांस्कृतिक राजधानीचे स्वरूप दिले. विद्वान, कवी, कलाकार आणि संगीतकारांना आश्रय देत ज्ञान आणि संस्कृतीचा प्रसार केला. आज जगप्रसिद्ध असलेल्या महेश्वरी साडी उद्योगाच्या विकासामागेही त्यांची दूरदृष्टी होती.

राजमाता असूनही त्यांचे जीवन अत्यंत साधे आणि अध्यात्मिक होते. सत्ता, संपत्ती किंवा वैभव यापेक्षा लोकसेवा हेच त्यांचे ध्येय होते. प्रजेला कुटुंबातील सदस्यांप्रमाणे वागणूक देणाऱ्या या महान राज्यकर्तीला जनतेने प्रेमाने "लोकमाता" आणि "पुण्यश्लोक" या उपाधींनी गौरविले.

13 ऑगस्ट 1795 रोजी महेश्वर येथे त्यांचे निधन झाले. मात्र त्यांचे कार्य आजही समाजाला प्रेरणा देत आहे. सुशासन, सामाजिक न्याय, महिला नेतृत्व, लोककल्याण आणि मानवतेचा आदर्श म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करण्यात येत असून, त्यांचा लोकसेवेचा आदर्श समाजाला कायम प्रेरणा देत राहील, अशी भावना व्यक्त होत आहे.

**– सौ. आशाताई बाजीराव ढाकणे**
**सामाजिक कार्यकर्त्या तथा सचिव, श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, जोळा, ता. केज, जि. बीड**

## पान 1 वरुन

पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी रास्ता रोको आणि पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्यात आलेदरम्यान, सकाळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांना सरकारच्या वतीने काही मसुदा देण्यात आला होता. तो मान्य असेल तर त्यासंदर्भात अध्यादेश काढण्याची तयारी सरकारने दाखवली होती. परंतु पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील मराठा आरक्षणाचे तज्ज्ञ, अभ्यासकांना अंतरवालीत सायंकाळी पाचपर्यंत येण्याचे आवाहन जरांगे पाटील यांनी केले. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतरच आपण पुढील दिशा ठरवू असे जरांगे पाटील यांनी त्यांना सांगितले.दरम्यान, मुंबईकडे निघालेले भाजपचे आमदार प्रसाद लाड यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतरवालीत जा, असा निरोप दिल्यामुळे ते पुन्हा छत्रपती संभाजीनगरमध्ये परतले आहेत. मनोज जरांगे पाटील यांची मराठा आरक्षण तज्ज्ञ आणि अभ्यासकांशी चर्चा झाल्यानंतर विखे पाटील, प्रसाद लाड हे पुन्हा अंतरवाली सराटीत जाणार आहेत. त्यानंतर सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांचे एकमत झाले तर उपोषण थांबवले जाऊ शकते, असे बोलले जाते. अंतरवालीमध्ये जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी गर्दी वाढू लागली आहे.

------------------------------------

प्रशासनाचे प्रमुख असतात, या नात्याने आपण त्यांची तात्काळ भेट घ्यावी अशी माझी सूचना आहे. अशा कडक उन्हात त्यांचं आमरण उपोषण त्यांच्या प्रकृतीसाठी योग्य नाही.

जिल्हयाची पालकमंत्री म्हणून त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी आवश्यक असल्यास मी येण्यास देखील तयार आहे. आपण तात्काळ जावून त्यांची भेट घ्यावी, त्यांच्याशी चर्चा करून त्यांचे निवेदन स्वीकारावे असे ना. पंकजाताईंनी म्हटले आहे.

----------------------------------

प्रत्येकवेळी अडचणीच्या काळात निर्णय घेतला आहे. सरकारची भूमिका पारदर्शक आहे. सरकारची भूमिका सकारात्मक आहे. ही सकारात्मक भूमिका सरकार सातत्याने मांडतय. यापुढेही सरकारची भूमिका सकारात्मकच असेल. आमचं सरकार सर्व समाजाकरता सकारात्मक काम करणारं सरकार आहे. आम्ही समाजाला पुढे आणून भांडण करत नाही. सर्वांचं कसं भलं हईल, याचा विचार करतो."

पुढे ते म्हणाले, "मराठा समाजाकारता मी आणि एकनाथ शिंदें यांनी जेवढे निर्णय घेतले तेवढे इतिहासात कधी झाले नाहीत. आम्ही मराठा समाजाच्या हिताकरता निर्णय घेत राहू. हे निर्णय घेत असताना उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे पालन करावं लागेल. याचा अवलंब न करता निर्णय घेतला तर ते निर्णय टिकणार नाहीत. सर्वोच्च न्यायालयाच्या कसोटीवर खरे ठरणारे सर्व निर्णय आम्ही घेऊ", असं आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी दिलंदरम्यान, मराठा समाजाच्या आरक्षणाचा निर्णय घेताना ओबीसी समाजाचा विचार करण्याबाबत देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मी स्पष्टपणे सांगतो की एका समाजाचं काढून दुसऱ्या समाजाला द्यायचं, असं आम्ही कधी करणार नाही. आम्ही मराठा समाजाचं समाधान करू. त्यावेळी ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. न्यायालय, कायदा आणि संविधान याच्या चौकटीत बसून कोणताही निर्णय घ्यायला तयार आहेत.".

------------------------------

बोलताना शिंदे म्हणाले की, "अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य जगप्रसिद्ध आहे. त्यांनी देशभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा आणि अन्नछत्रे उभारून समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या स्मारकासाठी छोटासा का होईना हातभार लावता आला, याचा मला अभिमान आहे. स्मारक उभारणीसाठी पुढाकार घेतलेल्या संस्थेचे विशेष अभिनंदन करत त्यांनी सांगितले की, मर्यादित जागेतही अत्यंत सुंदर आणि प्रेरणादायी स्मारक उभे राहिले आहे. अहिल्यादेवींच्या कार्याला खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे होय, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातील निर्णयांची आठवण करून देताना सांगितले की, चोंडी येथे झालेल्या जयंती सोहळ्यात अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण "अहिल्यादेवी नगर" करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. तसेच शेतकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या कर्जमाफी योजनेलाही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले असल्याचे त्यांनी नमूद केले."महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे सांगताना त्यांनी "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेचा उल्लेख केला. "अहिल्यादेवींनी महिलांना नेतृत्व, स्वावलंबन आणि समाजकार्यात पुढे येण्याचा संदेश दिला. त्याच विचारातून आम्ही महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध योजना राबवत आहोत," असे ते म्हणाले.

अहिल्यादेवींच्या कल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श आजही प्रेरणादायी असल्याचे सांगत त्यांनी शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी सरकार सातत्याने काम करत असल्याचा पुनरुच्चार केला.छत्रपती शिवाजी महाराज आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आम्ही राज्याचा विकास साधत आहोत. त्यांच्या कार्याची उंची इतकी मोठी आहे की, अशा शेकडो स्मारकांची उभारणी केली तरी ती कमीच पडतील," असे भावनिक उद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

या कार्यक्रमाला माजी खासदार विकास महात्मे, माजी खासदार आनंद परांजपे, माजी आमदार रवींद्र फाटक, ठाणे मनपातील विरोधी पक्षनेते शानू पठाण, ठाणे विधानसभा प्रमुख हेमंत पवार, नौपाडा विभागप्रमुख किरण नाकती, शिवसेना प्रवक्ते राहुल लोंढे, पत्रकार आणि धनगर प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक कुरकुंडे आणि धनगर समाजातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना "धनगररत्न पुरस्कार" प्रदान करून गौरविण्यात आले. कला क्षेत्रातील दत्तात्रय चिव्हाणे, शैक्षणिक क्षेत्रातील भगवान आसाराम गावडे, साहित्य क्षेत्रातील डॉ. महादेव गिरकर, सामाजिक क्षेत्रातील बिरू कोळेकर, शासकीय क्षेत्रातील संध्या खताळ, राजकीय क्षेत्रातील निहारिका खोंदले तसेच वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. सुवर्णा चोपडे यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी पुरस्कार विजेत्यांचे टाळ्यांच्या कडकडाटात अभिनंदन केले

------------------------------------

उद्या सकाळी ते आंदोलनाची वेळ आणि तारीख जाहीर करणार आहेत. याबाबत हाके यांनी काय म्हटलं ते जाणून घेऊयात.ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटले की, 'जर मनोज जरांगे यांचे आंदोलन सुरुच राहिले आणि त्यातून ओबीसी समाजाच्या हक्काच्या आरक्षणाला धक्का बसणार असेल, तर आम्हीही शांत बसणार नाही. उद्यापासून राज्यभरातील ओबीसी बांधवांच्या वतीने तीव्र आंदोलन सुरु करण्यात येईल. जरांगे बाजेवर बसून आंदोलन करत असतील, तर आम्ही ढेकळात बसून आंदोलन करू. आंदोलनाची तारीख, वेळ आणि ठिकाण याबाबतची माहिती उद्या सकाळी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केली जाईल.'राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनीही आंदोलनाचा इशारा दिला आहे. 'जरांगे पाटील यांचं आजपासून उपोषण सुरु झालं आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघ वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहे. आमच्या आक्षणाला धक्का लागला तर आम्ही रस्त्यावर उतरू. जरांगे पाटील यांना वेगळं आरक्षण द्या, आमच्या ताटातलं काहीही देऊ नका. ओबीसी प्रमाणपत्र देऊन बोगस ओबीसी आमच्यात आले तर आमचा समाज पेटून उठेल' असं तायवाडे यांनी म्हटलं आहे.पुढे बोलताना तायवाडे यांनी म्हटले की, 'सरकारने ओबीसी मंत्रालयाला मराठा नाव जोडल्यास ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल. अनेक वर्षांचे प्रयत्न आणि आंदोलनानंतर आम्हाला ओबीसी मंत्रालय मिळालं आहे. राज्य सरकार जरांगे पाटील यांना जो ड्राफ्ट देणार, त्याकडे आम्ही लक्ष ठेवून आहोत. सरकारच्या ड्राफ्टमध्ये आमच्या अधिकारावर गदा येत असेल, तर आम्ही शांत बसणार नाही.'

## पान 4 वरुन

सोनवणे यांनी पत्रात नमूद केले आहे.

सध्या उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून, अशा रखरखत्या उन्हात मनोजदादा जरांगे-पाटील यांनी अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. या उपोषणामुळे त्यांच्या प्रकृतीवर अत्यंत विपरीत परिणाम होण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे. मनोजदादांच्या आरोग्याबाबत राज्यातील कोट्यवधी मराठा बांधव-भगिनी कमालीचे चिंतित आहेत. त्यामुळे राज्य सरकारने या विषयाची तातडीने गंभीर दखल घेऊन मनोजदादांशी सकारात्मक संवाद साधावा, त्यांच्या मागण्यांवर योग्य तो निर्णय घ्यावा आणि सुरु असलेल्या उपोषणाचा कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी आग्रही विनंती खासदारांनी केली आहे.

पत्राच्या शेवटी खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्र्यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त केला आहे. आपण एक संवेदनशील आणि जनहितकारी मुख्यमंत्री म्हणून या अत्यंत संवेदनशील प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष द्याल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. सरकार यावर नक्कीच न्याय्य मार्ग काढून समाजामध्ये विश्वासाचे व सकारात्मक वातावरण निर्माण करेल, अशी आशा खा. सोनवणे यांनी पत्राद्वारे व्यक्त केली

-------------------------------------

बीड जिल्ह्यामध्ये भाजपाचे चांगले दिवस आणायचे असतील तर श्री राजेभाऊ ( अण्णा ) मुंडे व श्री बाबरी ( शेठ ) मुंडे यांच्या शिवाय पर्यायच नाही त्यामुळे श्री बाबरी ( शेठ ) मुंडे यांच्या मुलिच्या आणि मंत्री ताईसाहेब यांच्या व्हिडीओ कॉलच्या माध्यामातुन पित्रा - पुत्राच्या भाजपा पक्ष प्रवेशाला बळ मिळत असल्याचे दिसून येत आहे खात्रिशील माहितीच्या आधारे पिता - पुत्र यांचा घरवापसी भाजपा प्रवेश निश्चीत माणला जात असून मंत्री पंकजाताई सकारात्मक अनुकुल असून अण्णांच्या मुलाच्या लग्नसोहळ्याला ताई आवर्जुन उपस्थित राहाणार असून या सोहळ्या नंतर पक्ष प्रवेश होऊ शकतो असे नाव न छापण्याच्या अटीवर भाजपाच्या नेत्याने माहिती दिली त्या अनुषंगाने पिता आणि पुत्र यांचा भाजपा प्रवेश जवळपास निश्चित मानला जातो

-------------------------------------

प्रतिमा पुंजनचे आयोजन करण्यात आले आहे,त्यानंतर मिरवणुकीमध्ये आकर्षक वाद्य,आकर्षक देखावा,पारंपारिक ढोलांचा निनाद वाजणार आहे,भंडाऱ्याची उधळण होणार आहे.तरी सर्व अहिल्या भक्तांनी जयंती उत्साहात सहभागी व्हावे असे आवाहन समितीचे अध्यक्ष बालाजी गाढवे,उपाध्यक्ष अमोल भैरे,व तात्या रोडे यांनी केले आहे.

-----------------------------------------

यावेळी बोलताना मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी परळी औष्णिक विद्युत केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यरत असून भविष्यातही ते अधिक सक्षम व कार्यक्षमतेने चालू ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.कार्यक्रमात प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यांनीही मार्गदर्शन केले.

याप्रसंगी सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता एस. एस. भागवत, अधीक्षक अभियंता राजू रेड्डी, अधीक्षक अभियंता धनंजय कोकाटे, वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरणे, कार्यकारी अभियंता पंकज दगडे, कार्यकारी अभियंता मदन पवार, उपकार्यकारी अभियंता शिवाजी होटकर, शाहूराव येवते, उपकार्यकारी अभियंता डी. एस. डोंगरे, कार्यकारी रसायनतंत्रज्ञ सतीश मुंडे, मानव संसाधन विभागाचे विलास ताटे, श्रीगणेश मुंडे, सुनील पवार, पसारे साहेब, गरड साहेब, कामगार नेते हरीराम गित्ते, संदीप पाटील आदींसह अधिकारी, कर्मचारी, मित्र-परिवार व कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवाकार्याचा आढावा घेणारी विशेष चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गजले यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सहायक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले.सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेला गौरविणारा हा निरोप समारंभ अत्यंत भावनिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

------------------------------------------

तापमानामुळे नागरिकांचे हाल होत

सरपंच विजय राठोड, उपसरपंच कुंडलीक जाधव व ग्रामपंचायत सदस्य रमेश पवार यांनी मानले आभार

होते. या पार्श्वभूमीवर परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे तसेच माजी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे यांनी हा प्रश्न तात्काळ दखल घेत नवीन रोहित्र उपलब्ध करून दिले

व नागरिकांचा विजेचा प्रश्न मार्गी लावला. अचानक निर्माण झालेल्या या अडचणीमुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मात्र आ. धनंजय मुंडे व अजय मुंडे यांनी तत्परता दाखवत त्वरीत कार्यवाही केल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेषतः कडक उन्हाळ्यात वीजपुरवठा सुरळीत झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. धारावती तांडा (खदनवस्ती) येथील वीजचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल आ. धनंजय मुंडे व अजय मुंडे यांचे सरपंच विजय राठोड, उपसरपंच कुंडलीक जाधव तसेच ग्रामपंचायत सदस्य रमेश पवार व ग्रामस्थ यांनी आभार मानले असून नागरिकांच्या प्रश्नांबाबत त्यांनी घेतलेल्या तत्पर भूमिकेचे धारावती तांडा येथील ग्रामस्थ यांनी कौतुक केले आहे.

धारावती तांडा (खदनवस्ती) येथील विजेचा प्रश्न निर्माण झाला होता. उष्णतेमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. आमदार धनंजय मुंडे व अजय मुंडे यांनी तात्काळ दखल घेऊन नवीन रोहित्र उपलब्ध करून दिल्यामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. नागरिकांच्या प्रत्येक प्रश्नासाठी साहेब कायम तत्पर असतात. सरपंच विजय राठोड

गावातील वीजपुरवठा सुरळीत झाल्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. आमदार धनंजय मुंडे व अजय मुंडे यांनी त्वरीत कार्यवाही करून ग्रामस्थांची अडचण दूर केली. गावाच्या विकासासाठी आणि लोकांच्या प्रश्नांसाठी त्यांचे सहकार्य कायम लाभत आहे. उपसरपंच कुंडलीक जाधव

--------------------------------------

दुबे,श्रीकांत पाथरकर,मिलिंद घाडगे,आर.जी.स्वामी,शेख हबीब,संदीप तिळकरी,गजानन कोकीळ,शेख अजीज,बालासाहेब मुजमुले,चित्राताई देशपांडे,सुनील जठार इत्यादींनी स्वाक्षरी केलेली आहे.

या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने सोमवार दि.8 जून रोजी सकाळी आठ वाजता रेल्वे स्थानकावर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

-----------------------------------------

बसल्याचे सांगण्यात येत आहे.

या घटनेची प्रशासनाने व कंपनीने तात्काळ दखल घेऊन त्याची नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून नुकसानीचा प्राथमिक अंदाज घेऊन तात्काळ पंचनामे करावेत. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याची माहिती समोर आली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, गेल्या काही दिवसांपासून परिसरात वातावरणात मोठे बदल होत असून अचानक येणारे वादळी वारे आणि अवकाळी पावसामुळे शेतीसह विविध मालमत्तांचे नुकसान होत आहे. चिंचवडगाव परिसरातील अनेक भागांना या वादळी वाऱ्याचा फटका बसला आहे.

प्रशासनाने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून आवश्यक ती मदत व उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, ओसवाल कंपनी लिमिटेडकडून नुकसानग्रस्त पॅनलची दुरुस्ती व पुनर्बांधणीचे काम तातडीने हाती घेण्यात यावे असे शेतकरी धारकाकडून मागणी होताना दिसत आहे.

---------------------------------------------

नाही असे अनेक पुढारी आहेत ज्यांनी चिंचोली माळी ते साळेगाव रस्त्याच्या नावाखाली जनतेला वेड्यात काढले आहे निवडणूक तोंडावर आश्वासन देऊन जातात नंतर निवडून येतात कागदी घोडे नाचवून निधी मंजूर करून हडप करतात व पुढच्या निवडणुकीत नंतर तोंडवर करुन येतात तरी येणाऱ्या निवडणुकीच्या अगोदर चिंचोली माळी ते साळेगाव रस्त्याचे काम सुरु करण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून व्यापाऱ्यांनकडून करण्यात येत आहे .त्यामुळे चिंचोली माळी ते साळेगाव रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने मार्गी लावावे असे अशी मागणी नागरिकांन कडुन करण्यात येत आहे नागरिकांची मागणी आहे.

--------------------------------------

चार कोटी रुपये खर्चून उभारलेल्या योजनेचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचत नसेल तर हा सार्वजनिक निधीचा गंभीर प्रश्न असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. योजनेच्या कामांची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करून दोषींवर कारवाई करावी तसेच प्रत्येक घराला नियमित पाणीपुरवठा तातडीने सुरु करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. सध्या "हर घर जल" ऐवजी "हंडाभर पाण्यासाठी भटकंती" अशी स्थिती निर्माण झाली आहे.

संबंधित विभागाने योजनेत कोणतीही त्रुटी नसल्याचा दावा केला आहे. कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे पाणीपुरवठ्यात अडथळा येत असल्याचे कारण पुढे केले जात आहे. मात्र ग्रामस्थांनी हा दावा फेटाळला आहे. निकृष्ट दर्जाचे साहित्य, अपूर्ण कामे आणि नियोजनाचा अभाव यामुळेच योजना फेल ठरल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

सरपंच सुनील तौर यांनी स्पष्ट केले की, प्रत्येक घराला नियमित पाणी मिळाल्याशिवाय आणि योजना पूर्णपणे यशस्वी झाल्याचे सिद्ध झाल्याशिवाय ग्रामपंचायत योजना ताब्यात घेणार नाही. त्यामुळे शासनाचा "काम पूर्ण" चा दावाच संशयास्पद ठरला आहे.

मानवी हक्क अभियानाचे सचिव कपिल आडागळे यांनी गावातील भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी मुख्यमंत्री, पाणीपुरवठा मंत्री, जिल्हाधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग बीड यांच्याकडे तक्रारी आणि आंदोलने केली. मात्र चौकशी न होता उलट तक्रारदार हे वैयक्तिक लाभासाठी तक्रारी करत असल्याचा आरोप संबंधित विभागाकडून करण्यात आला आहे.

कपिल आडागळे म्हणाले, "गावाला पाणी मिळत नाही म्हणून आम्ही तक्रारी केल्या. पण योग्य कारवाई होत नाही. चौकशीसाठी समिती गावात येत नाही, जिल्ह्याच्या ठिकाणावरुनच कागदपत्री चौकशी होते. तक्रार केली म्हणून माझ्यावर राजकीय दबाव आणि धमक्याही दिल्या जात आहेत."

---------------------------------------

मतदारसंघाला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, अशी मागणी केली. त्यांच्या या स्पष्ट व रोखठोक भूमिकेची दखल घेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी "तुला पाचवा जिल्हाप्रमुख व्हायचे का?" असे सूचक वक्तव्य केले. या वक्तव्यामुळे उपस्थित पदाधिकारी व शिवसैनिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले असून धनंजय पापा सोळंके यांच्या नेतृत्वाला पक्षश्रेष्ठींकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याची चर्चा सुरु झाली आहे.

बैठकीत बोलताना धनंजय पापा सोळंके यांनी माजलगाव शहरात छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकांसाठी जागा उपलब्ध करून निधी मंजूर करण्यात शिवसेनेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिल्याचे सांगितले. शिवसैनिकांच्या हक्काचा निधी, विकासकामे आणि संघटनात्मक बळकटीसाठी संघर्ष कायम राहील, तसेच शिवसैनिकांवरील अन्याय सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली.

या आढावा बैठकीस मंत्री भरत गोगावले, खासदार संदीपान भुमरे, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, माजी खासदार आनंद परांजपे, युवासेना नेते अभिमन्यू खोतकर, रुपेश कदम यांच्यासह जिल्हा, तालुका व शहरस्तरीय पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

बैठकीत संघटन विस्तार, आगामी निवडणुकांची तयारी, शिवसैनिकांच्या समस्या आणि विकासकामांचा आढावा घेण्यात आला. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीने बीड जिल्ह्यातील शिवसेना संघटनेला नवी ऊर्जा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

जे शिवसैनिकांच्या मनात ते माझ्या ध्यानात खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांचे धनंजय पापा सोळंके यांना उद्देशून थेट सवाल तुला जिल्हाप्रमुख व्हायचं आहे का? शिवसंवाद बैठकीत खासदार श्रीकांत शिंदे यांचे सुतवाच

-------------------------------------

लावण्यात आला होता.

घटनास्थळी उपस्थित पलटन नायक एक बी. जी. शेख यांनी जवानांच्या सतर्कता आणि शौर्याचे विशेष कौतुक केले. होमगार्ड जवानांच्या या प्रसंगावधानामुळे एका कुटुंबावर येणारी मोठी आपत्ती टळली. सध्या माजलगाव पथकात या जवानांच्या कार्याची चर्चा होत आहे.

------------------------------------------

ऐकून घेतल्यानंतर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आर. बी. पोळ यांनी आरोपीविरुद्ध सबळ पुरावा नसल्याचे निरीक्षण नोंदवले. त्यामुळे आरोपी भारत पी. मुरलीधर डावरे यांची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश देण्यात आला.

या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. डी. एच. कसबे यांनी काम पाहिले. वाळू चोरी व गौण खनिज प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता झाल्याने ॲड. डी. एच. कसबे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

---------------------------------------------

टप्पयांत विभाजन करण्यात आले आहे. हे वेळापत्रक पुढील आदेश येईपर्यंत कायम राहणार असल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली आहे. एका कृषी फीडरवर चार तासांचा विद्युत पुरवठा होत असल्याने उर्वरित 20 तास लोडशेडिंग होत आहे. त्यामुळे विहिरी, बोअरवेल आणि पंप बंद पडत आहेत. परिणामी, ऊस, केळी, भाजीपाला तसेच फळबागांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. आधीच कडक उन्हामुळे पिके वाळू लागली आहेत. त्यातच विद्युत पुरवठा कमी झाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. दरम्यान, कडक उन्हाळ्यामुळे पाण्याअभावी पिकांना मोठा फटका बसत आहे. उत्पादन खर्च वाढत आहे. त्यात उत्पन्नात घट होत असल्याने शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. या गंभीर समस्येकडे तात्काळ लक्ष देऊन कृषी वीज पुरवठा नियमित व सुरळीत करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून महावितरण व प्रशासनाकडे करण्यात येत आहे.

हॅलो बीड

परळी संघर्षनेता

रविवार दि. 31 मे 2026



# जायकवाडीच्या पाण्यासाठी बीडमध्ये बैलगाडी मोर्चा

## मागणीची पूर्तता न झाल्यास पायी दिंडी काढत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या घरासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला.

बीड : येत्या दीड महिन्यात गोदावरी सिंदफणा नदीजोड प्रकल्प व उपकालव्याचे सर्वेक्षण करा, 168 टीएमसी मध्ये बीड जिल्ह्यातील शेतीला हक्काचे पाणी द्या यासह इतर मागण्या पूर्ण करा, अशी मागणी विराट बैलगाडी मोर्चातून रखरखत्या उन्हात आलेल्या शेतकऱ्यांनी केली.मागणीची पूर्तता न झाल्यास पायी दिंडी काढत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या घरासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला. बीडमध्ये शेतकऱ्यांनी जायकवाडीच्या पाण्यासाठी शुक्रवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.



यावेळी कालीदास आपेट, सुशीलाताई मोराळे, भाऊसाहेब जरांगे पाटिल, समन्वयक दिनेश गुळवे, राहुल लोंढे, अप्पासाहेब महानोर, बाबुराव जेठे, अप्पासाहेब तळेकर, मोहन गुंड, कुलदिप करपे, संतोष भारती, बालासाहेब कोळेकर, राजाभाऊ महाराज कुटे, परमेश्वर वाघमोडे, देविदास वाणी, महादेव गायकवाड,संजय जाधव, ज्ञानेश्वर शेरकर, गोरक्ष परदेशी, शामराव घुगे, भास्कर मार्कड, पपू पवळ, महादेव रडे, जालिंदर रसाळ, बप्पासाहेब रत्नपारखे, अशोक काळे, लक्ष्मण नागरगोजे, सुधाकर नागरगोजे, रामेश्वर गाडे, काशीनाथ जोगदंड, राज सवासे, राजाराम निर्मळ, लक्ष्मण काशीद, भारत पवार, साई गावडे, बळीराम राक्षे, अजय गोयकर, गणेश हाडुळे आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावा

## खा.बजरंग सोनवणे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विखे-पाटील यांना थेट पत्र


बीड: मराठा समाजाच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने संघर्ष करणारे मनोजदादा जरांगे-पाटील यांनी आजपासून रखरखत्या उन्हात पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसले आहे. त्यांच्या या आंदोलनामुळे राज्यातील कोट्यवधी मराठा बांधवांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, राज्य सरकारने आता कोणताही वेळ न दवडता यावर तातडीने आणि सकारात्मक तोडगा काढावा, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना थेट पत्र पाठवून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.



खा. बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे की, मराठा समाजाच्या आरक्षणासह इतर प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मनोजदादा जरांगे-पाटील हे दीर्घकाळापासून शांततेच्या व लोकशाही मार्गाने लढा देत आहेत. त्यांच्या मागण्या मराठा समाजाच्या भावना आणि अपेक्षांशी थेट निगडित आहेत. मात्र, गेल्या अनेक महिन्यांपासून या मागण्यांवर राज्य सरकारकडून अपेक्षित निर्णय न झाल्यामुळे संपूर्ण मराठा समाजामध्ये तीव्र अस्वस्थता आणि कमालीची नाराजी वाढत असल्याचे खा. पान 3 वर

# मंत्री पंकजाताई मुंडे पिता - पुत्र श्री फुलचंद ( बाबरी शेठ ) राजेभाऊ( अण्णा ) मुंडे यांना भाजपा मध्ये घेण्यासाठी अनुकुल

## मुलाच्या विवाहा - नंतर होऊ शकतो पक्ष प्रवेश ?



धारूर ( बाबुराव तिडके ) सहकार क्षेत्रातील तथा राजकिय रणांगणातील शुक्रतारा म्हणून बीड जिल्ह्याच्या धर्तिवर श्री राजेभाऊ ( अण्णा ) मुंडे यांना ओळखले जाते लोकनेते मुंडे साहेब असताना देखील भाजपाचे सर्व राजकिय सुत्र अण्णांच्या हाती होते त्यानंतर देखिल मंत्री पंकजाताईंना सुद्धा लोकसभा अथवा विधानसभा इतर कोणत्याही निवडणुका असल्या तरी जिल्ह्याचे भाजपाचे पूर्ण राजकारण चांगल्या प्रकारे हाताळून मंत्री ताईसाहेब यांना मोठी मदत अण्णांची होत असे सद्यस्थितीत बीड जिल्ह्यमध्ये अण्णांसारखा विश्वासु सहकारी भाजपा मध्ये नसल्याने बीड जिल्ह्यमध्ये भाजपाचे तीन - तेरा वाजल्याचे दिसुन येत आहे परत पान 3 वर

# केज येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 वी जयंती भव्य दिव्य साजरी होणार - तात्या रोडे

केज प्रतिनिधी/रोहन गलांडे



केज येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 व्या जयंती निमीत्त 31 में रोजी केज येथे महाराणी अहिल्यादेवी होळकर यांची भव्य दिव्य अशी जयंती साजरी करण्यात येणार आहे,तरी केज तालुक्यात समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन समितीचे अध्यक्ष बालाजी गाढवे,उपाध्यक्ष अमोल भैरे,व तात्या रोडे यांनी केले आहे.केज येथे अहिल्यादेवींच्या बॅनरने वातावरण जलोषमय झाले आहे,31 मे रोजी सकाळी 9 वाजता अहिल्यादेवी नगर येथे पान 3 वर



# परळी औष्णिक विद्युत केंद्रात सिरसाट, वंजारे, कोठेकर व किर्दंत यांना निरोप

## मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार



परळी | प्रतिनिधीपरळी औष्णिक विद्युत केंद्रातील अति. कार्यकारी अभियंता भीमराव माणिक सिरसाट, मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक महादेव सखाराम वंजारे, कोळसा हाताळी विभागातील श्रेणी-2 कर्मचारी सुधीर वसंतराव कोठेकर तथा तंत्रज्ञ-1 दिपक जनार्धनराव किर्दंत यांना सेवानिवृत्तीनिमित्त दि. 29 मे 2026 रोजी सायंकाळी 5 वाजता प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात सत्कारपूर्वक निरोप देण्यात आला.सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. पान 3 वर

# आ. धनंजय मुंडे व अजय मुंडे यांनी धारावती तांडा येथील विजेचा प्रश्न लावला मार्गी

## सरपंच विजय राठोड, उपसरपंच कुंडलीक जाधव व ग्रामपंचायत सदस्य रमेश पवार यांनी मानले आभार



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-धारावती तांडा (खदनवस्ती) येथील विजेचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला होता. कडक उन्हाळ्यात ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. आमदार धनंजय मुंडे व अजय मुंडे यांनी तात्काळ दखल घेऊन नवीन रोहित्र उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आ.धनंजय मुंडे व अजय मुंडे यांनी धारावती तांडा (खदनवस्ती) येथील विजेचा प्रश्न तात्काळ लावला मार्गी लावल्याबद्दल लमानतांडा ग्रुप ग्रामपंचायत सरपंच विजय राठोड, उपसरपंच कुंडलीक जाधव व ग्रामपंचायत सदस्य रमेश पवार यांनी आभार मानले आहेत.

परळी तालुक्यातील धारावती तांडा (खदनवस्ती) येथे 200 पावरचा रोहित्र जळाल्यामुळे संपूर्ण परिसरात विजेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. मे महिन्यातील तीव्र उष्मा व तब्बल 43 अंश पान 3 वर

# परळी परिसरातील रेल्वे प्रवाश्यांच्या प्रमुख मागण्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 8 जून रोजी धरणे आंदोलन



परळी वैजनाथ/प्रतिनिधी ज्योतिर्लिंग क्षेत्र प्रभू वैद्यनाथाच्या परळी रेल्वे स्थानकातून नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने सिकंदराबाद -परळी- छत्रपती संभाजी नगर-नाशिक मार्गे मुंबई तसेच नवनिर्मित अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या मार्गे परळी-नगर-पुणे-मुंबई,परळी-नगर-शिर्डी तसेच विविध तीर्थक्षेत्रे जोडण्यासाठी थेट रेल्वे सुरु करणे,परळी रेल्वे स्थानकात पीट लाईनची सोय करणे व नांदेड-पनवेल रेल्वे बोगींची संख्या वाढविणे इत्यादी मागण्यांची योग्य दखल रेल्वे प्रशासनाने घेतली नसल्याने विविध संघटनांनी 8 जून रोजी धरणे आंदोलन रेल्वे स्थानक परिसरात करण्याचा निर्णय घेतला आहे.

याबाबतचे लेखी निवेदन स्टेशन प्रबंधक श्री.मीना यांना देण्यात आले.

या निवेदनावर प्रवासी संघटनेचे अध्यक्ष जी.एस. सौंदळे,परळी रेल्वे विकास समितीचे निमंत्रक विलास ताटे,प्रमुख पदाधिकारी कैलास तांदळे,मराठवाडा जनता विकास परीषद परळी शाखा अध्यक्ष चेतन सौंदळे,प्रा.सत्यनारायण पान 3 वर

# चिंचवडगाव येथे वादळी वाऱ्याचा फटका

## सुमित्रा रामेश्वर घुगे यांच्या ओसवाल कंपनी लिमिटेडचा संपूर्ण पॅनल बँड



वडवणी | प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचवडगाव येथे मंगळवार दि.26 हे 2026 रोजी रात्री झालेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले असून, सुमित्रा रामेश्वर घुगे यांचे ओसवाल कंपनी लिमिटेडचे गट क्रमांक 58 मधील संपूर्ण पॅनल बँड झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात या घटनेची चर्चा सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वडवणी तालुक्यातील चिंचवडगाव परिसरात अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने प्रचंड वेग धारण केला होता. या वादळामुळे ओसवाल कंपनी लिमिटेडच्या प्रकल्प परिसरातील गट क्रमांक 58 मधील संपूर्ण पॅनल उखडून पडले. अनेक ठिकाणी साहित्याचे नुकसान झाले असून संरचनांनाही फटका पान 3 वर

# साळेगाव ते चिंचोली माळी रोड बनला मृत्यूचा सापळा/ सर्वसामान्य सामान्य जनतेचे हाल बेहाल का ?



केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील ग्रामीण मार्ग चिंचोली माळी ते साळेगाव हा रस्ता प्रमुख मार्गाला जोडनारा मार्ग आहे परंतु त्या रस्त्याला कुणी वाली आहे का नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे तसेच चिंचोली माळी येथुन अनेक वाहने साळेगाव बाजार दिवशी वाहतूक होते दळणवळण होतात पन अनेक वर्षे झाले रस्ता दुरुस्त केला जात नाही अनेक पुढाऱ्यांनी चिंचोली माळी ते साळेगाव रस्त्यावर कागदी घोडे नाचवून निधी हडप केला आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरु आहे.परंतु रस्त्यावर साधे डांबर सुध्दा टाकले पान 3 वर

# जलजीवन मिशनचा गोंधळ : टाकरवनची योजना कागदावर पूर्ण, वास्तवात कोरडी नळ

माजलगाव प्रतिनिधी : केंद्र सरकारच्या “हर घर जल” या महत्त्वाकांक्षी योजनेचा नारा टाकरवन गावात फोल ठरला आहे. तब्बल 4 कोटी 16 लाख 31 हजार 966 रुपये खर्चून उभारलेली जलजीवन मिशनची पाणीपुरवठा योजना कागदावर पूर्ण दिसत असली, तरी प्रत्यक्षात ग्रामस्थांना आजही हंडाभर पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.



जलजीवन मिशन अंतर्गत टाकरवन येथील पाणीपुरवठा योजनेला 3/12/2021 रोजी तांत्रिक मान्यता मिळाली होती. नियमानुसार 18 महिन्यात काम पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र 2026 उजाडले तरी अनेक घरांपर्यंत नियमित पाणी पोहोचले नाही. गावातील महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी लांब अंतर पार करावे लागत असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप आहे. पान 3 वर

# ...अन तुला पाचवा जिल्हाप्रमुख व्हायचे का?

## - खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे धनंजय पापा सोळंके यांना सूचक संकेत

माजलगाव | ( अनंत घडसिंगे ) शिवसेनेच्या राज्यव्यापी ‘शिवसंवाद दौऱ्या’अंतर्गत बीड व माजलगाव विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी व शिवसैनिकांची आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीला शिवसेना नेते तथा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.



बैठकीत माजलगाव शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी माजलगाव मतदारसंघातील संघटनात्मक प्रश्न, विकासनिधीचे असमान वाटप आणि शिवसैनिकांवरील अन्याय याबाबत परखड भूमिका मांडली. त्यांनी मागील चार वर्षांपासून माजलगाव मतदारसंघाला डीपीडीसी अंतर्गत कोणताही निधी मिळाला नसल्याचा मुद्दा उपस्थित करत जिल्हा नेतृत्वाने मतदारसंघावर अन्याय केल्याची खंत व्यक्त केली.

यावेळी सोळंके यांनी बीड शहरातील एकाच भागातून अनेक जिल्हाप्रमुखांची नियुक्ती करण्याऐवजी प्रत्येक विधानसभा पान 3 वर

# पुरुषोत्तमपुरी येथे होमगार्ड जवानाच्या सतर्कतेमुळे बुडणाऱ्या भाविकाचे प्राण वाचले

माजलगाव, ( अनंत घडसिंगे ) : अधिक मास यात्रेनिमित्त पुरुषोत्तमपुरी येथे आलेल्या एक भाविक नदीपात्रात बुडत असताना होमगार्ड जवानांच्या त्वरित कृतीमुळे जीव वाचला. बोटीच्या साहाय्याने त्याला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.



सविस्तर माहिती अशी की, अधिक मास यात्रेसाठी आले भाविक भक्त गोदावरीपात्रात स्नानासाठी गेले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने एक इसम पाण्यात बुडू लागला. ही घटना बंदोबस्तावरील होमगार्ड जवानांच्या लक्षात येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता बोट घेऊन पाण्यात उडी मारली आणि त्या व्यक्तीला सुखरुप बाहेर काढले.

या बचावकार्यात माजलगाव होमगार्ड पथकातील होमगार्ड राजेश पंडित, सुरेश भारस्कर सनद क्र. 950 आणि मुजाहिद शेख सनद क्र. 779 यांनी धैर्य दाखवले. तालुका समादेशक अधिकारी मा. एम. एम. पांचाळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त पान 3 वर

# पुराव्या अभावी वाळू चोरी प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता,न्यायालयाचा निर्णय

## 2017 च्या वाळू चोरी प्रकरणी डावरेना दिलासा

माजलगाव, ( अनंत घडसिंगे ) : वाळू चोरीच्या गुन्ह्यात आरोपी असलेल्या भारत मुरलीधर डावरे यांची माजलगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी मा. आर. बी. पोळ यांनी सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे.



माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात 13 जुलै 2017 रोजी आरोपी भारत डावरे यांच्याविरुद्ध गु.र.नं. 229/17 अन्वये भा.दं.वि. कलम 379, 188 तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन कायदा कलम 21(1) व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 48(1) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरण R.C.C. 229/17 शासन वि. भारत म्हणून न्यायप्रविष्ट होते.दि. 13/07/2017 रोजी दाखल गुन्ह्याच्या सुनावणीत दोन्ही बाजूंचा युक्तिवाद पान 3 वर

# केज तालुक्यात कृषी फीडरवर 20 तासांचे भारनियमन, शेतकरी चिंताग्रस्त,केवळ चार तास वीज, ऊस-फळबागांना फटका !

केज प्रतिनिधी/रोहन गलांडे

केज तालुक्यात सध्या वीज टंचाईच्या संकटामुळे कृषी फिडरवर 20 तासांचे लोडशेडिंग केले जात आहे. केज तालुक्यातील सर्व कृषी फिडरवर श्री फेजचा विद्युत पुरवठा केवळ चार तासांचा करण्यात आला आहे. त्यामुळे ऊस, केळीसह इतर फळबागा व भाजीपाला पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने शेतकऱ्यांवर संकटाचा सामना करण्याची वेळ आली आहे.विजेच्या टंचाईमुळे विद्युत महावितरण कंपनीच्या मुख्य



कार्यालयाने दिलेल्या आदेशानुसार 28 मेपासून सकाळी 6 ते सायंकाळी 6 या वेळेत श्री फेज विद्युत पुरवठा केला जात त्यामुळे एजी फौडरचे चार-चार तासांच्या पान 3 वर